**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी आर्थिक वर्षासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात कृषी, रस्ते विकास, पर्यटन आदि क्षेत्रांसाठी विविध योजनांची घोषणा,

- शेतकऱ्यांसाठी २ लाखापर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांची मदत मिळणार, महाराष्ट्र अमृतकाळ रस्ते विकास योजना राबवणार/आकांक्षित जिल्हा आणि तालुका योजनेचा विस्तार

- येत्या आर्थिक वर्षात राज्याची महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये राहण्याचा अंदाज

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ९७ अंकांची घसरण

**आणि**

- मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात येत्या दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

राज्याला २०४७ पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सादर केला. यंदाचा अर्थसंकल्प हा आगामी वर्षाचा जमाखर्च नसून विकसित महाराष्ट्र २०४७ कडे जाणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी कृषी, रस्ते विकास, पर्यटन यासारख्या क्षेत्रासाठी त्यांनी आज विविध योजनांची घोषणा केली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड कॅप्सूल**

*३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत लाभ सरकार देणार आहे. २०४७ पर्यंत कृषी क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्जवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. कृषी क्षेत्रासाठीच्या विविध योजनांविषयी ते म्हणाले…*

***- - होल्ड - मुख्यमंत्री कृषी - -***

*मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक, मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजनेची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करायचा निर्णयही सरकारनं घेतला आहे.*

*मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर रस्ते केले जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी आज अर्थसंकल्पात सांगितलं. याशिवाय महाराष्ट्र अमृतकाळ रस्ते विकास योजनेची घोषणा त्यांनी केली. याअंतर्गत ६ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे दृतगती मार्ग, सुमारे १५ हजार किलोमीटर लांबीचे राज्य आणि रस्ते मार्ग तसंच पर्यटन स्थळांना जोडणारे ४ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे रस्ते उभारणार असल्याचं फडनवीस म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेची घोषणाही त्यांनी केली. तसंच १ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिटच्या रस्त्यांनी जोडण्याचा मानस त्यांनी जाहीर केला.*

*आकांक्षित जिल्हा आणि तालुका योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या जिल्ह्यांचा समावेश राज्य सरकारनं केला आहे. सध्या गडचिरोली, नंदूरबार,*

*धाराशिव आणि वाशिम जिल्हे यात आहेत. या दहा जिल्ह्यातल्या ७७ तालुक्यांसह इतर जिल्ह्यात मिळून एकूण १०० तालुक्यांवर सरकार विशेष लक्ष देणार आहे.*
*येत्या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती घटकांसाठी २३ हजार कोटी रुपयांहून अधिक तर आदिवासींसाठी पावणे २२ हजार कोटींची तरतूद आहे. कातकरी, कोलम, माडिया तसंच पारधींसाठी विशेष पॅकेजद्वारे निधी राखीव ठेवण्याचा मानस राज्य सरकारनं व्यक्त केला आहे.*
*२०२६-२७ हे सामाजिक समता आणि समरसता वर्ष असेल, असं अर्थसंकल्पात म्हटलं आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध उपक्रमांची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज अर्थसंकल्पात केली.*

***होल्ड - मुख्यमंत्री फुले गाडगेबाबा***

*बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध योजना सरकार जाहीर करणार आहे. तसंच अजित पवार यांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज केली. त्यांच्या नावे गतीमान नागरिक सेवा पुरस्कार जाहीर करणार असल्याचंही फडनवीस म्हणाले.*

**<><><><><>**

नागपुरात महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था तर सातारा जिल्ह्यातल्या दरे गावात निसर्गोपचार केंद्र सुरू केलं जाणार आहे. मुंबईत वैदिक ज्ञान आणि संगीत परंपरेवर आधारित वेलनेस उत्कृष्टता केंद्र प्रस्तावित आहे. कर्करोग, मधुमेह, हृदयविकाराची तपासणी करण्यासाठी ग्रामीण भागात दरवर्षी तपासणी शिबिर राबवण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक जिल्ह्यात MSME केंद्र स्थापन केलं जाणार असून MSME आणि सेवा क्षेत्रासाठी आयुक्तालयाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली. राज्यात नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. राज्यातल्या परदेशी पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी मुंबई, सिंगापूर आणि दुबईत विशेष केंद्र स्थापन

केली जाणार आहेत. दिव्यांगासाठी राज्यात ३६ कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र स्थापन केली जाणार आहेत. याशिवाय स्टार्टअपसाठी महाराष्ट्र उद्योजकता महाफंड स्थापन करण्याची घोषणा अर्थसंकल्पात आहे.

ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये राज्यातले अधिकाधिक खेळाडू पात्र व्हावे यासाठीच्या आणखी ४ उत्कृष्टता केंद्र सुरू केली जाणार आहेत. विभागीय स्तरावर २५ तर जिल्हास्तरावर ९६ क्रीडा केंद्र विकसित करण्याचं संकल्प त्यांनी अर्थसंकल्पात व्यक्त केला.

**<><><><><>**

एकूण ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प देवेंद्र फडनवीस यांनी आज सादर केला. गेल्यावर्षीचा अर्थसंकल्प सुमारे ७ लाख ५६ कोटी रुपयांचा होता. यंदाच्या अर्थसंकल्पात ६ लाख १६ हजार कोटी रुपयांहून अधिक महसुली जमा आणि ६ लाख ५६ हजारांहून अधिक महसुली खर्च अपेक्षित आहे. येत्या आर्थिक वर्षात राज्याची महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये असेल. तर राजकोषीय तूट दीड लाख कोटींच्या वर जाईल, असा सरकारचा अंदाज आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचं आश्वासन, अर्थसंकल्पात तरतूद करून सरकारनं पूर्ण केलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधिमंडळ परिसरात वार्ताहर परिषदेत बोलताना केलं. प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार स्तंभावर आधारित आजचा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही यावेळी उपस्थित होत्या.

रस्ते, मेट्रो, जलमार्ग यांचं जाळं राज्यात उभारलं जात असून ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासाच्या दृष्टीकोनाचं प्रतिबिंब अर्थसंकल्पात दिसतं असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

**होल्ड - बाईट - एकनाथ शिंदे**

प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देणारा हा अर्थसंकल्प असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. शेती क्षेत्र, पायाभूत सुविधा, दिव्यांग विकास यासाठी भरीव तरतूद केली असून शेतकरी कष्टकरी महिला युवा यांच्या विकासाला चालना देणारा हा अर्थसंकल्प ठरेल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक, विकासाभिमुख आणि राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग प्रशस्त करणारा असल्याची प्रतिक्रिया माजी अर्थमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे.

निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता या अर्थसंकल्पात केली नसल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली....

**होल्ड - बाईट - उद्धव ठाकरे**

हा अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचा आणि आकड्यांचा मारा करत जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली आहे, अशी टीका काँग्रेसचे विधानसभेतले नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धामुळे वाढलेला भू-राजकीय तणाव, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम आशियाई शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ९७ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ९१९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३१५ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ४५० अंकांवर बंद झाला.

हाँगकाँगचा हँग सेंग हा निर्देशांक १ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढला. जपानचा निक्केई २२५ निर्देशांक ६ दशांश टक्के इतकाच वाढला. चीनचा शांघाय कंपोझिट ४ दशांश टक्क्यांनी वाढला. तर सिंगापूरच्या स्ट्रेट्स टाईम्स निर्देशांकात किंचित भर पडली तर दक्षिण कोरियाचा कोस्पी स्थिर राहिला. फ्रान्सचा सीएसी ४० एक टक्क्याने तर जर्मनीचा जीएएक्स निर्देशांक ९ दशांश टक्क्यांनी घसरला.

<><><><><>

मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील, तर तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर याच चार जिल्ह्यांमध्ये पुढचे दोन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><>//